डिसेंबर-२०२४ ✻ अंक-६ वा

# अजिंठा

## रोटरी क्लब जळगाव

क्लब क्र.15512 रो.डिस्ट्रीक्ट 3030 रोटरी वर्ष 2024-25




आर.आय.प्रेसिडेंट
**रो. स्टेफनी अर्चिक**


डिस्ट्रिक्ट गव्हर्नर
**रो. राजिंदरसिंग खुराना**


प्रेसिडेंट
**रो. ॲड. सागर चित्रे**


ऑन.सेक्रेटरी
**रो. पराग अग्रवाल**


बुले.कमिटी चेअरमन
**रो. स्वाती ढाके**

THE MAGIC OF ROTARY




CLUB THEME 2024-25

## संपादकीय....

सर्व बंधू भगिनींना रोटरी प्रणाम!

रोटरी इंटरनॅशनल ही जागतिक पातळीवरील सर्वात मोठी सामाजिक संघटना आहे विविध क्षेत्रांमधील ती कार्यरत आहे जसे समाजातील गरजूंना वैद्यकीय व इतर काही सेवा प्रदान करणे डिसेंबर महिना हा रोग प्रतिबंध आणि उपचार डेसिग्नेटेड मंथ आहे त्या अनुषंगाने लेख पान नंबर ४ वर दिलेला आहे रोटरीचे सर्वात मोठे कार्य हे पोलिओ निर्मूलन आहे त्यासाठी आजही रोटरी कार्यरत आहे

सर्वाइकल कॅन्सर मुळे दर पाच मिनिटाला एका महिलेचा मृत्यू होतो भारतात कॅन्सर होण्याचे हे दुसरे प्रमुख कारण आहे तर जगभरातले हे चौथ्या नंबरचे प्रमुख कारण आहे .या कॅन्सर प्रकाराला व्हॅक्सिनेशन द्वारा आपण प्रतिबंध करू शकतो, म्हणून रोटरी ३०३० आणि कॅन्सर पेशंट एड असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमानाने सर्वाइकल कॅन्सर व्हॅक्सिनेशन आणि अवेअरनेस प्रोग्राम घेण्यात येत आहे. महाराष्ट्राध्ये ९५६० मुलींना सर्वाइकल कॅन्सर व्हॅक्सिनेशन देण्यात आले. यानंतर उत्तर प्रदेश मध्ये ४००० मुलींना व्हॅक्सिनेशन देण्यात येणार आहे. नंतर वेस्ट बंगाल, जम्मू कश्मीर येथे सुद्धा हा प्रकल्प राबवण्यात येणार आहे. उर्वरित महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये सुद्धा हा प्रकल्प जोरात राबविण्यात येत आहे .यावर्षीचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर राजेंद्र खुराणा सरांना पूर्ण भारतामध्ये हा उपक्रम राबवायचा आहे.

चला तर मग पुन्हा सर्वजण एकत्र येऊन पोलिओ प्रमाणेच सर्वाइकल कॅन्सर निर्मूलनाचा निश्चय करूया

लेक अनमोल उपहार, लेक वाचवा मानव जात वाचवा.

**– रो. स्वाती ढाके**

## अध्यक्षीय.....

रोटरी प्रणाम,

बुलेटीनच्या सहाव्या अंकात पुन्हा आपल्याशी संवाद साधताना मला खूप आनंद होत आहे. गेल्या सहा महिन्यांमध्ये आपण मोठे मोठे प्रोजेक्ट घेते. त्यात रोटरी इंटरनॅशनल चे प्रेसिडेंट शेखर मेहता आपल्याकडे इन्स्टॉलेशन साठी आले होते. त्यानंतर डिस्ट्रिक्ट अवॉर्ड फंक्शन आपण घेतले आणि नुकतेच लीगल एड कमिटी तर्फे कंज्यूमर ॲक्ट २०१९ ॲंड मेडिकल निगलीजन्स यावर मोठा सेमीनार यशस्वीरित्या पार पाडला. मेडिकल नॉन मेडिकल इंटरॅक्ट कमिटीतर्फे ही उपक्रम राबविण्यात आले यात सहकार्य करणाऱ्या सर्व रोटेरियन चे मनापासून धन्यवाद इथे सर्वांचे नाव घेऊ शकत नाही म्हणून क्षमस्व. या महिन्याच्या पहिल्या आठवड्यामध्ये आपण बॉक्स क्रिकेट धमाल सीजन फोर आयोजित केलेला आहे. सगळ्यांचा आवडतीचा विषय असलेला आणि अद्भुत पूर्व अशी फ्रेलोशिप आणि संघटन या काळात आपल्याला पाहायला मिळते. बॉक्स क्रिकेट करता जवळजवळ एक महिन्यापासून नियोजन करणाऱ्या कमिटीला, सर्व टीम ओनर्स आणि बॉक्स क्रिकेट स्पॉन्सर, सर्व सहभागी स्पर्धक सर्वांचे विशेष धन्यवाद .आपल्या सर्वांच्या विशेष प्रयत्नामुळे हा इतका सुंदर उपक्रम आपण एवढ्या मोठ्या प्रमाणावर पार पाडत आहोत.

डिसेंबर महिना हा डिसीज प्रिव्हेन्शन ॲंड ट्रीटमेंट म्हणून डेझिग्निटेड मंथ आहे .या महिन्यात आपण मेडिकल कमिटी तर्फे विविध प्रोजेक्टचे आयोजन करणार आहेत या महिन्याच्या २० तारखेला आपले माननीय प्रांतपाल राजेंद्र खुराना सर आपल्या क्लबला ऑफिशियल व्हिजिट देणार आहेत. दिवसभर आपला भरगच्च असा कार्यक्रम राहील, तरी सर्वांना विनंती आहे की, संध्याकाळी आपल्याला मार्गदर्शन करतील त्यावेळेस जास्तीत जास्त संख्येने उपस्थिती द्यावी.

**– रो. ॲड. सागर चित्रे**

# नोव्हेंबर महिन्यातील साप्ताहिक सभा

*** १ नोव्हेंबर –** रोजी दिवाळी निमित्त साप्ताहिक सभा घेण्यात आली नाही.

*** ८ नोव्हेंबर –** रोजी आयोजित साप्ताहिक सभा ही फॅमिली मिटींग होती. यावेळी ७ नवीन सदस्यांचे इंडक्शन करण्यात आले.







*** १५ नोव्हेंबर–** रोजी आयोजित साप्ताहिक सभेत बॉक्स क्रिकेट धमाल–४ या स्पर्धेसाठी टिम तयार करण्यात आल्या.

*** २२ नोव्हेंबर** – रोजी आयोजित साप्ताहिक सभेत लिग एड कमिटी तर्फे घेण्यात येणाऱ्या पब्लिक सेमीनार च्या तयारी बाबत चर्चा आणि अंमलबजावणी करण्यात आले.






*** २९ नोव्हेंबर–** रोजी आयोजित साप्ताहिक सभेचा विषय होता 'द रोटरी फाऊंडेशन : कनेक्ट फार चेन्ज्'' यावेळी वक्ते होते पीडीजी रो.डॉ.आनंद झुनझुनवाला या कार्यक्रमात मॉडरेटर होते पी.पी.रो.प्रेम कोगटा.

## जनसंपर्क समिती

रोटरी क्लबबद्दल समाजाची धारणा अशी आहे की आपण आठवड्यातून एकदा केवळ जेवणासाठी भेटतो. खरं तर आपण समाजाच्या सेवेसाठी वेगवेगळे उपक्रम राबवित असतो. तीच आपली ओळख असली पाहिजे. (आपण समाजाची ही धारणा कशी बदलू शकतो ?) आपले मत / सूचना गिरीश कुळकर्णी यांना ९८२३३४०८४ कळवा. नाविन्यपूर्ण सूचना / उपाय यांना पुढील अंकात स्थान दिले जाईल तसेच सभासदाचे विशेष कौतुक व बक्षीस देण्यात येईल.

– संपादक

# नोव्हेंबर महिन्यातील प्रोजेक्टस्




✻ **२० नोव्हेंबर** – रोजी असलेल्या मतदानास १००% प्रतिसाद मिळावा म्हणून रोटरी क्लब जळगाव तर्फे शहरात विविध ठिकाणी होर्डींग लावण्यात आले होते. तसेच रोटरी हॉल गणपती नगर येथे सेल्फी बूथ तयार करून यावेळी मतदान करणाऱ्यांना चॉकलेट आणि पाण्याची बॉटल देण्यात आली.




✻ **२१ नोव्हेंबर** – रोजी पास्ट प्रेसिडेंट मनोज जोशी यांच्या फॅक्टरीत २०० जणांचा मेडीकल चेकअपचा प्रोजेक्ट घेण्यात आला. यावेळी अध्यक्ष रो.ॲड. सागर चित्रे, मानद सचिव रो. पराग अग्रवाल, असिस्टंट गव्हर्नर जितेंद्र ढाके, मेडीकल कमिटी चेअरमन डॉ. जयंत जहागीरदार, प्रोजेक्ट चेअरमन पी.पी.रो.मनोज जोशी तसेच डॉ.शशिकांत गाजरे, डॉ.ज्ञानेश पाटील, डॉ.सुर्यवंशी, डॉ.हेमंत बाविस्कर, डॉ.ओम भावसार, डॉ.घुगे, डॉ.माधुरी कासट, डॉ.सुमेधा सुलेखा, डॉ.केवल मेहता, डॉ.पियुष रमोलीया, डॉ.उदय शेळके, डॉ.पवनकुमार तायडे आणि रोटरीचे इतर पदाधिकारी उपस्थित होते,.

✻ **२३ नोव्हेंबर** – रोजी रोटरी हॉल येथे इंटरॅक्ट च्या विद्यार्थ्यांना साठी ड्रॉईंग कॉम्पीटीशन घेण्यात आली यामध्ये नंदिनीबाई महिला स्कूल, भगीरथ स्कूल, शकुंतला माध्यमिक विद्यालय, संत हरदासराम स्कूल अशा विविध शाळांच्या एकूण ४२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. रो.सुबोध सराफ परीक्षक म्हणून लाभले होते. या चित्रकले स्पर्धेसाठी पर्यावरण सुरक्षा अवयव दान आणि आपली भारतीय संस्कृती व सण असे विषय देण्यात आलेले होते. उत्कृष्ट ६ चित्रांना पारितोषिक देण्यात आली. यावेळी असिस्टंट गव्हर्नर जितेंद्र ढाके, अध्यक्ष रो. ॲड. सागर चित्रे, मा.सचिव रो. पराग अग्रवाल, इंटरॅक्ट, कमिटी चेअरमन डॉ.काजल फिरके, इंटरॅक्ट कमिटी आणि रोटरीचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.







✻ **२३ नोव्हेंबर** – रोजी रोटरी हॉल येथे इंटरॅक्ट च्या विद्यार्थ्यांना वॉश ॲंड विन कमिटी तर्फे हायजिन कीट आणि सहभागी शाळांना हात स्वच्छ धुण्याचे नियम असलेला बोर्ड देण्यात आला यामध्ये नंदिनीबाई स्कूल. भगीरथ स्कूल शकुंतला माध्यमिक विद्यालय, संत हरदास राम स्कूल अशा विविध शाळांचे एकूण ४२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला यावेळी अध्यक्ष रो. ॲड. सागर चित्रे, मा. सचिव रो. पराग अग्रवाल, असिस्टंट गव्हर्नर जितेंद्र ढाके, वॉश ॲंड विन कमिटी चेअरमन विश्वजीत बऱ्हाटे व रोटरीचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

✻ **२४ नोव्हेंबर** – रोजी लीगल एड कमिटी तर्फे पब्लिक सेमिनार न्यू कंजूमर प्रोटेक्शन ॲक्ट २०१९ आणि मेडिकल निग्लिजन्स या विषयावर आयोजित करण्यात आला होता त्याची सविस्तर माहिती पान नंबर ६ वर आहे



# पोलीओ निर्मुलन

रोटरी तर्फे पोलिओ निर्मूलन, मुलाला पोलिओची लस दिली जात आहे, पोलिओ विरुद्धच्या लढ्यात खोलवर रुजलेले सहकार्य रोटरी करीत आहे.

रोटरी आणि पीएएचओ यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे अमेरिकेला पोलिओ–मुक्त प्रमाणित करण्यात आलेला जगातील पहिला प्रदेश बनवण्यात आणि गेल्या काही वर्षांतील कामगिरी कायम ठेवण्यास मदत झाली आहे.

पॅन अमेरिकन हेल्थ ऑर्गनायझेशन आणि रोटरी अमेरिकेच्या प्रदेशात पोलिओच्या उच्चाटनासाठी २५ वर्षांहून अधिक काळ एकत्र काम करत आहेत. ग्लोबल पोलिओ इरेडिकेशन इनिशिएटिव्हचे संस्थापक भागीदार म्हणून, रोटरीने ३० वर्षांपासून या रोगापासून मुक्त होण्यावर लक्ष केंद्रित केलेल्या जागतिक उपक्रमाचे नेतृत्व केले आहे, ज्यामुळे मुलांना लसीकरण करण्याच्या पहिल्या प्रकल्पापासून पोलिओच्या रुग्णांमध्ये ९९.९% घट झाली आहे. १९७९ मध्ये फिलीपिन्समध्ये.

रोटरी हे जगभरातील १.२ दशलक्ष लोकांचे जागतिक नेटवर्क आहे ज्यांच्या सदस्यांचा विश्वास आहे की शांतता वाढवण्यासाठी, रोगाशी लढा देण्यासाठी, माता आणि मुलांना वाचवण्यासाठी, शिक्षणाला पाठिंबा देण्यासाठी, स्वच्छ पाणी पुरवण्यासाठी, स्वच्छता आणि स्वच्छतेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि वाढीसाठी एकत्रितपणे कृती करण्याची त्यांची जबाबदारी आहे. स्थानिक अर्थव्यवस्था. त्यांच्या ३५,०००+ क्लबद्वारे, संस्था त्यांच्या व्यवसाय, व्यावसायिक आणि समुदाय नेत्यांच्या फेलोशिपद्वारे इतरांना सेवा प्रदान करते.

प्रादेशिक आणि देश पातळीवर, रोटरी १९८० च्या दशकाच्या सुरुवातीपासून पोलिओमायलिटिसच्या निर्मूलनासाठी पीएएचओ साठी एक प्रमुख भागीदार आहे. लसीकरण मोहिमेची अंमलबजावणी करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या निधीच्या तरतुदीद्वारे – अतिदुर्गम भागांसह – प्रादेशिक बैठकांमध्ये सहभाग, आणि प्रदेशातील देशांमध्ये सक्रिय कार्य, रोटेरियन्सनी रोगमुक्त प्रमाणित जगातील पहिला प्रदेश म्हणून पीएएचओ ला पाठिंबा दिला आहे, १९९४ मध्ये, आणि आता ही स्थिती कायम राखत आहे.

**महत्त्वाकांक्षी परिणामांसाठी सतत आणि उत्कट समर्पण–** रोटरीने पोलिओ निर्मूलनाच्या समर्थनार्थ जागतिक आणि प्रादेशिक उपक्रमांचे उद्घाटन आणि प्रभाव पाडला आहे. १९८९ मध्ये, देणग्या युएसडी २७ दशलक्ष पर्यंत पोहोचल्या आणि अमेरिकेतील २७ देशांना मदत केली. रोटरीने २००७ पासून बिल आणि मेलिंडा गेट्स फाऊंडेशनचे जुळणारे निधी योगदान यासारख्या इतर अनेक संस्था आणि संस्थांना एकत्र आणण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

रोटरी पोलिओविरूद्धच्या लढ्यात अग्रणी होती आणि पोलिओमुक्त जगापर्यंत पोहोचण्याच्या अत्यंत महत्त्वाकांक्षी ध्येयाने १९७८ मध्ये प्रयत्न सुरू केले. आर्थिक आणि राजकीय संकटांसह अत्यंत आव्हानात्मक काळात रोटेरियन्सने या प्रदेशाचे समर्थन केले आहे. रोटरी सदस्य १९८१ पासून प्रदेशातील सर्व देशांमध्ये कायमस्वरूपी उपस्थित आहेत आणि पीएएचओ सह दीर्घकाळ चालणाऱ्या या सहकार्यामध्ये त्यांनी मूलभूत भूमिका बजावली आहे.

पीएएचओ आणि रोटरी यांच्यातील सहकार्य ही एक भक्कम भागीदारी आहे जी पारंपारिक आर्थिक मदतीच्या पलीकडे जाते, ज्यामध्ये रोटेरियनचा वैयक्तिक उत्साह आणि वचनबद्धता समाविष्ट असते. संस्था स्थानिक आणि प्रादेशिक मीटिंगमध्ये सहभागी होण्यासाठी, ज्ञानाची देवाणघेवाण करण्यासाठी आणि प्रत्येक रोटेरियन जिल्ह्यात या मिशनसाठी दैनंदिन उपस्थिती आणि उत्कट समर्पणासह, निधी आणि प्रयत्न एकत्रित करण्यासाठी विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित करण्यासाठी तिचे नेटवर्क आणि समन्वय वापरते. जवळपास ३० वर्षांपासून प्रदेश पोलिओमुक्त ठेवण्यात रोटरी पीएएचओ ची खरी भागीदार आहे. आगामी आव्हानांना सामोरे जाण्यासाठी संघटना सतत संबंध अधिक दृढ करण्यासाठी आपली इच्छा दर्शवते, अशा प्रकारे जागतिक निर्मूलन साध्य होईपर्यंत एकत्र लढण्यावर लक्ष केंद्रीत करते.

# इतिहासातील सुवर्ण पान

**माजी अध्यक्ष रो.प्रेम कोगटा**



१९८५ –८६ मध्ये रोटेरियन प्रेम कोगटा यांनी छबील भाई शहा यांच्या आमंत्रणाला मान देऊन रोटरी क्लब जळगावचे सदस्यत्त्व स्वीकारले.

त्यावेळेस स्वर्गीय मधुकरराव वारके साहेब क्लबचे अध्यक्ष होते. त्यानंतर रो.सुरेंद्र लुंकड आपल्या क्लबचे अध्यक्ष झाले. त्यावर्षी पहिल्याच वर्षी त्यांना फेलोशिप कमिटीचे चेअरमनपद दिले गेले. दरवर्षी एक एक कमिटीचा अनुभव ते घेत गेले. दोन वर्षातच ते संचालक मंडळाचे सदस्य झाले. तेव्हापासून ते आज ३७–३८ वर्ष ते संचालक मंडळाचे सदस्य आहेत .सर्व कमिटीतही त्यांनी काम केलेले आहे.

पूर्वी साप्ताहिक बुलेटीन निघत असे आप्पासाहेब खांबेटे यांनी अनेक वर्ष अतिशय तळमळीने व मनापासून संपादकाचे काम पाहिले. त्यांच्यानंतर ही जबाबदारी रोटेरियन प्रेम कोगटा यांनी दोन वर्ष सांभाळले. यात त्यांना खूप शिकायला मिळाले आणि समृद्ध ही केले असे त्यांचे मत आहे. पूर्वी लॅडर पद्धत होती. पाच ते सहा वर्ष काम केल्यानंतर मग अध्यक्ष होता यायचं. त्या अनुसार १९९३– ९४ मध्ये ते रोटरी क्लब जळगावचे अध्यक्ष झाले .त्यानंतर त्यांनी डिस्ट्रिक्ट मध्येही मानाचे स्थान मिळवले .मुंबई ते नागपूर संपूर्ण भागात त्यांचे खूप सारे मित्र झाले.

त्यांच्या कार्यकाळात महाराष्ट्रातील व देशातील नावाजलेल्या व्यक्तींची व्याख्याने क्लबला ऐकावयास मिळाली . यावेळेस डॉक्टर प्रदीप जोशी हे प्रोग्राम कमिटी चेअरमन होते. डॉक्टर मु व शहा, प्राचार्य राम शेवाळकर, डॉक्टर नरेंद्र दाभोळकर, निळू फुले, डॉ.श्रीराम लागू, डॉक्टर यशवंत पाठक, प्राचार्य शिवाजीराव भोसले यांची तीन दिवसाची व्याख्यानमालाच ठेवली होती. तसेच माजी प्रांतपाल यांची ही व्याख्याने झाली .त्यावर्षीचा त्यांना अटेंडन्स अवॉर्ड ही मिळाला होता. बेस्ट प्रेसिडेंट सोबत १७ वेगवेगळ्या ट्रॉफीज त्यावेळी आपल्या क्लबला मिळाल्या. यासाठी चांगले वक्ते, चांगले मेडिकल, प्रोजेक्ट नॉन, मेडिकल प्रोजेक्ट ही खरी उपलब्धी वर्षाच्या शेवटी त्यांच्याजवळ असल्याने त्यांच्या कामाचे कौतुक झाले. रोटरी मध्ये मिळालेली प्रत्येक जबाबदारी त्यांनी मनापासून आणि गांभीर्याने पार पाडली. त्यामुळेच त्यांना रोटरीतून खूप काही शिकावयास मिळाले. सामाजिक, कौटुंबिक, व्यावसायिक, वैयक्तिक काम करताना याचा त्यांना फायदा झाला. अध्यक्षपदाच्या कारकीर्दीत त्यांना त्यांच्या आवडीचे प्रकल्प राबवण्याची संधी व त्यासाठी व्यासपीठ उपलब्ध झाल्यामुळे त्यांच्यातील नेतृत्व गुणाला चालना मिळाली .त्यांना एक चांगला माणूस बनविले. असे त्यांचे प्रांजळ मत आहे.

# पब्लीक सेमीनार

**रो.ॲड. हेमंत भंगाळे**



रोटरी क्लब जळगांव यांनी वनिता मल्टी स्पेशालिटी हॉस्पीटल, जळगांव यांचे सहकार्याने लिगल एड कमिटी मार्फत नवीन ग्राहक संरक्षण कायदा, २०१९ व वैद्यकीय निष्काळजीपणा या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रात मुंबई उच्च न्यायालयय, नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती श्री. जी. ए. सानप, मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती श्री. ए. पी. भंगाळे, राष्ट्रीय ग्राहक आयोगाचे निवृत्त सदस्या डॉ. एस. एस. कांतीकर, राज्य ग्राहक आयोगाचे छत्रपती संभाजी नगर खंडपीठाचे सदस्य श्री.मिलिंद सोनवणे तसेच महाराष्ट्र ग्राहक आयोगाच्या सदस्या सौ.पुनम महर्षी या मान्यवरांनी मार्गदर्शन केले. या चर्चासत्रात रूग्णसेवा करतांना कर्तव्य म्हणून योग्य ती काळजी घ्यावी, रूग्णांचे रेकॉर्ड व कागदपत्रे व्यवस्थित ठेवणे. तसेच रेकॉर्डवर रूग्णांची स्वाक्षरी घेतांना लक्ष देणे, सेवा देतांना तत्त्वांचे पालन करणे, त्याच प्रमाणे न्यायालय अथवा ग्राहक आयोग हे डॉक्टरांचे विरूद्ध असल्याबाबतचा गैरसमज काढून टाकून योग्य काळजी घेऊन रूग्णांना सेवा देणे असे मार्गदर्शन मान्यवरांनी केले. या चर्चासत्रात रोटरी क्लबचे सर्व सदस्य, जिल्ह्यातील डॉक्टर्स, वैद्यकीय महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी, विधि महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी, वकील मंडळी व तसेच जळगाव मधील नागरिक असे ५५० ते ६०० जनसंख्या उपस्थित होती. या चर्चासत्रात नंतर रोटरी क्लब जळगांव यांना या कार्यक्रमाचे आयोजना करीता नागरीकांनी अभिनंदन केले व तसेच प्रमुख अतिथी यांनी देखील कार्यक्रमाबाबत उत्कृष्ट कार्य व उत्तम व्यवस्थापन बाबत शुभेच्छा दिल्या.

















# नोव्हेंबर महिन्यातील काही छायाचित्रे






















## जीवेत् शरदः शतम्...!

| | | |
|---|---|---|
| १) | १ डिसेंबर | रो.डॉ. सुनिल सुर्यवंशी |
| २) | ४ डिसेंबर | रो. राजू अडवाणी |
| ३) | ७ डिसेंबर | रो. पंकज व्यवहारे |
| ४) | १५ डिसेंबर | रो. संध्या महाजन |
| ५) | १७ डिसेंबर | रो.रविंद्र पाटील |
| ६) | २४ डिसेंबर | पीडीजी रो.चंद्रशेखर सिकची |
| ७) | २७ डिसेंबर | रो. प्रदीप खिवसरा |

## नांदा सौख्यभरे...

| | | |
|---|---|---|
| १) | ४ डिसेंबर | रो. डॉ.महेश पाटील |
| २) | ६ डिसेंबर | रो. त्रिभुवन शहा |
| ३) | ८ डिसेंबर | रो. प्रदीप खिवसरा |
| ४) | १० डिसेंबर | रो. प्रेमशंकर अग्रवाल |
| ५) | ११ डिसेंबर | पीपी रो.सुरेंद्र लुंकड |
| ६) | १४ डिसेंबर | रो. केदारनाथ मुंदडा |
| ७) | १५ डिसेंबर | रो. राकेश चव्हाण |
| ८) | १५ डिसेंबर | रो. डॉ. सुनिल सुर्यवंशी |
| ९) | १८ डिसेंबर | रो. सुनिल येवलेकर |

## डिसेंबर महिन्यातील कॅप्टन

सदर कॅप्टन यांनी डिसेंबर महिन्यात क्लबच्या सर्व कमिटी चेअरमन यांचेशी समन्वय साधून त्यांच्या कामात मदत करणे.



रो.डॉ.शुभदा कुलकर्णी



रो.डॉ.शमा सराफ

## अभिनंदन!

✻ पी.पी.रो.कॅप्टन मोहन कुलकर्णी यांचे डिस्ट्रीक्ट स्कॉलरशिप चेअर म्हणून रो.वर्ष २०२५-२६ साठी नियुक्त करण्यात आले आहे. रोटरी तर्फे मतदान कार्यात जागरूकता केल्याच्या कार्यासाठी कॅप्टन कुलकर्णी यांचा मा.जिल्हाधिकारी आयुषप्रसाद साहेब यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.

✻ पी.पी.रो.मनोज जोशी यांना डिस्ट्रीक्ट इन्ट्रॅक्ट चेअर म्हणून रो.वर्ष २०२५-२६ साठी नियुक्त करण्यातआले आहे.

✻ रोटरी क्लब अमळनेर यांनी आयोजित केलेल्या रिफलेक्शन या डिस्ट्रीक्ट पब्लिक इमेज सेमीनार मधील पहिल्या पॅनल चर्चेत अध्यक्ष रो.ॲड.सागर चित्रे सहभागी झाले होते. तसेच या सेमीनार मध्ये रो.स्वाती ढाके यांनी 'मिडीया मॅनेजमेंट' या विषयावर मार्गदर्शन केले.